# Mumbai Police Constable Recruitment- 2019

## OPEN Category (Total Posts : 512)

## Provisional Select List

| Sr. No. | Name | Caste Category | Horizontal Category | Total Marks | Birthdate |
|---|---|---|---|---|---|
| 1 | VIKRAM BHAGOJI MORE | EWS | | 138 | 28/07/1992 |
| 2 | MANU NAGU SHELAKE | NT-C | | 138 | 29/01/1995 |
| 3 | VIKRAM BHAU DONGARE | OBC | | 138 | 01/12/1996 |
| 4 | SWAPNIL VILAS MAGAR | EWS | | 138 | 31/01/1998 |
| 5 | VISHAL NETAJI PATIL | OBC | | 138 | 29/09/1999 |
| 6 | SHUBHAM ASHOK GHADAGE | OPEN | | 137 | 11/03/1997 |
| 7 | AKASH ASHOK ARADE | OBC | | 137 | 09/06/1997 |
| 8 | HARSHAL GANESH SHINDE | OBC | | 137 | 14/01/1998 |
| 9 | AJAR HABIB SHAIKH | OPEN | | 137 | 24/02/1998 |
| 10 | SURAJ UTTAM MANE | EWS | | 137 | 04/09/1998 |
| 11 | PRADIP UKHA RATHOD | VJ-A | | 137 | 05/12/1998 |
| 12 | AJAY SHIVAJI KHUTWAD | OPEN | | 136 | 30/12/1993 |
| 13 | VISHAL DATTATRAY JADHAV | EWS | | 136 | 12/11/1995 |
| 14 | VILAS PANDHARINATH MORE | OPEN | EARTHQUAKE AFFECTED | 136 | 16/11/1997 |
| 15 | SHUBHAM BHIKAJI GHULE | OBC | | 136 | 01/03/1998 |
| 16 | SHIVAJI DATTATRAY YEGURLE | NT-C | | 136 | 12/08/1998 |
| 17 | PAVAN SUBHASH BEDRE | EWS | | 136 | 15/04/1999 |
| 18 | SANTOSH BHIKAJI UGAVE | EWS | | 136 | 17/07/1999 |
| 19 | SUSHIL ROHIDAS BHOSALE | OBC | | 136 | 24/04/2000 |
| 20 | AMOL GINYANDEV DAHIPHALE | NT-D | | 136 | 17/12/2000 |
| 21 | RAOSAHEB LAXMAN KHAIRNAR | OBC | | 135 | 15/09/1990 |
| 22 | SHANKAR SUBHASH NAGARE | NT-D | | 135 | 19/02/1994 |
| 23 | AMOL GAJANAN ANDHALE | NT-D | | 135 | 01/01/1995 |
| 24 | BHAGWAN BABU YEDAGE | NT-C | | 135 | 26/01/1995 |
| 25 | DIPAK GAJANAN LAHANE | OBC | | 135 | 27/08/1996 |
| 26 | SURESH BALASO PAWAR | OPEN | EARTHQUAKE AFFECTED | 135 | 05/06/1997 |
| 27 | AKSHAY SAMBHAJI KARAPE | OPEN | | 135 | 21/06/1997 |
| 28 | HANUMAN VINAYAK WANI | EWS | | 135 | 15/09/1997 |
| 29 | AMIT SADASHIV JADHAV | OPEN | | 135 | 02/10/1997 |
| 30 | SURAJ RANAVIJAY THAKUR | OPEN | | 135 | 17/10/1997 |
| 31 | VISHAL SHANKARRAO PATIL | OBC | | 135 | 19/10/1997 |
| 32 | RAHUL SURESH SHELAR | OPEN | | 135 | 20/12/1997 |
| 33 | ADITYA NAMDEV KUMBHAR | OBC | | 135 | 04/08/1998 |
| 34 | SHUBHAM BHURAJI GUNJAL | EWS | | 135 | 22/03/1999 |
| 35 | NAGESH SHASHIKANT VIBHUTE | SC | | 135 | 20/09/1999 |
| 36 | GANESHGIRI DEVAGIRI GOSAVI | NT-B | | 135 | 26/09/1999 |
| 37 | AKASH RAJENDRA GORANE | NT-C | | 135 | 11/11/1999 |
| 38 | SHUBHAM RANGRAO PATIL | OPEN | | 135 | 30/11/1999 |
| 39 | SUYASH SANTOSH RAUT | OBC | | 135 | 12/03/2000 |
| 40 | SANDIP RAMESHWAR TOMPE | EWS | | 135 | 24/05/2001 |
| 41 | VIKRAM DILIP JAGTAP | EWS | | 134 | 25/08/1992 |
| 42 | SANTOSH ANGADRAO PATIL | EWS | | 134 | 15/03/1993 |
| 43 | ADITYA ANAND CHINDARKAR | OBC | | 134 | 04/04/1994 |
| 44 | ANANDA DINKAR MHASKE | SC | | 134 | 03/10/1995 |
| 45 | AKSHAYKUMAR BHAUSAHEB RANSING | OPEN | | 134 | 23/11/1995 |
| 46 | ROSHAN VINAYAK SASE | OBC | | 134 | 19/02/1996 |
| 47 | ABHISHEK BHAGAVAN SHINDE | OBC | | 134 | 17/04/1996 |
| 48 | SAGAR BHALCHANDRA KALE | OPEN | | 134 | 31/08/1996 |
| 49 | BHANUDAS ARJUN TAKALE | NT-C | | 134 | 04/05/1997 |
| 50 | SANGMESHWAR MALKAARJUN DINDE | NT-C | | 134 | 17/07/1997 |
| 51 | SHUBHAM SHANKAR PATIL | OPEN | | 134 | 23/12/1997 |
| 52 | AYOJODDIN MASIFODDIN MOMIN | EWS | | 134 | 22/07/1998 |
| 53 | HANAMANT BAPUSO KOLEKAR | NT-C | | 134 | 06/09/1998 |
| 54 | DAYANAND GANGADHAR NAGMOTE | OBC | | 134 | 14/09/1998 |
| 55 | ANKITA PRAKASH GAIKWAD | SC | FEMALE | 134 | 09/10/1998 |
| 56 | JAVED JAINUDDIN SHAIKH | EWS | | 134 | 01/04/1999 |
| 57 | SHUBHAM MARUTI PATIL | EWS | | 134 | 13/04/1999 |
| 58 | KRUSHNA SANTOSH VARKAD | EWS | | 134 | 19/04/1999 |

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in
Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

# - प्रवेश प्रमाणपत्र -

**परीक्षेचे नावं : महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - 2021**

| | | |
|---|---|---|
| **बैठक क्रमांक :-** | KL038225 | **उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी** |
| **नोंदणी क्रमांक :-** | 00226920212901220306665 |  |
| **उमेदवाराचे नावं :-** | GURAV SHIVRAJ ASHOK | |
| **उमेदवाराचे बदलेले नाव (असल्यास):-** | -- | |
| **जिल्हा केंद्र:-** | Kolhapur | |
| **परीक्षेचे ठिकाण :-** | DR. D. Y. PATIL COLLEGE OF ENGINEERING, SALOKHE NAGAR, KOLHAPUR. | |

| परीक्षेचा वार व दिनांक | उपकेंद्रावरील उपस्थिती | परीक्षा कक्षातील शेवटच्या प्रवेशाची वेळ | परीक्षेचा प्रत्यक्ष कालावधी | विषय | विषयाचा संकेतांक | परीक्षेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|
| **रविवार,03 एप्रिल, 2022** | सकाळी 9.30 | सकाळी 10.30 | सकाळी11.00ते 12.00 | सामान्य क्षमता चाचणी | **012** | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**सहसचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

## -: अत्यंत महत्वाचे :-

1. प्रवेश प्रमाणपत्रावरील उपरोक्त मजकूर उमेदवाराने काळजीपूर्वक तपासणे आवश्यक असून यासंदर्भात काही अडचण/संदिग्धता असल्यास परीक्षेच्या दिनांकापूर्वीच आयोगाच्या कार्यालयाशी संपर्क साधणे आवश्यक आहे.
2. मोबाईल फोन अथवा अन्य दूरसंचार साधने परीक्षा उपकेंद्राच्या परिसरात आणण्यास, बाळगण्यास अथवा त्याचा वापर करण्यास सक्त मनाई आहे.

## -: उमेदवारांना सूचना :-

1. परीक्षा उपकेंद्रावरील उपस्थितीबाबत :-

1.1 परीक्षा उपकेंद्रावरील उपस्थितीकरीता निर्धारित केलेल्या वेळेस उपस्थित राहून उपस्थिती नोंदविणे अनिवार्य आहे.

1.2 आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र परीक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा परीक्षेस प्रवेश नाकारला जाईल

1.3 उमेदवारांची तपासणी/झडती (Frisking), थर्मो गनच्या सहाय्याने उमेदवारांच्या शारीरिक तापमानाची तपासणी (Thermal Screening), लक्षणे दिसून येत असलेल्या उमेदवारांची स्वतंत्र बैठक व्यवस्था करणे, ओळख पडताळणी करणे, हजेरी नोंदविणे, सूचना देणे इत्यादी स्वरुपाच्या कार्यवाहीसाठी परीक्षा उपकेंद्रावर प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान दीड तास अगोदर उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

1.4 परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उदभवू शकणाऱ्या अडचणी अथवा आंदोलने, मोर्चे, वाहतूक समस्या, अतिवृष्टी इत्यादी बाबी लक्षात घेऊन, विहित वेळेच्या पुरेसे अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

1.5 परीक्षा कक्षामध्ये शेवटच्या प्रवेशासाठी विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही अथवा

यासंदर्भात आयोगाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही

1.6 परीक्षा उपकेंद्राच्या आवारामध्ये मित्र, नातेवाईक, पालक अथवा अन्य अनधिकृत व्यक्तींना कोणत्याही परिस्थितीत प्रवेश अनुज्ञेय नाही.

1.7 परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहण्याकरीता उमेदवारांनी शक्यतो सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. खाजगी वाहनांच्या पार्किंगकरीता उपकेंद्रावर कोणतीही व्यवस्था करण्यात येणार नाही

1.8 परीक्षेवेळी मद्य आणि/किंवा मादक अमली पदार्थांचे प्राशन केलेले आढळल्यास उमेदवारांवर उचित कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, अशा उमेदवारांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा निवडीकरिता प्रतिरोधित करण्यात येईल.

1.9 पडताळणी/तपासणी संदर्भातील कार्यवाही झाल्यानंतर स्वत :च्या बैठक क्रमांकावर जाऊन बसणे अनिवार्य आहे.

2. ओळखीच्या पुराव्याबाबत :-

2.1 परीक्षेच्या वेळी ओळखीच्या पुराव्यासाठी खालीलपैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र सादर करणे अनिवार्य आहे :-

(1) आधारकार्ड
(2) निवडणूक आयोगाचे ओळखपत्र
(3) पासपोर्ट
(4) पॅनकार्ड
(5) स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स

2.2 परीक्षेच्या वेळी प्रवेश प्रमाणपत्र आणि/अथवा वर नमूद पाच वैध (Valid) ओळखपत्रांपैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची सुस्पष्ट छायांकित प्रत सादर न केल्यास परीक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल.

2.3 मूळ ओळखपत्राच्या पुराव्याऐवजी केवळ त्याच्या छायांकित प्रती अथवा कलर झेरॉक्स अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा ओळखीचा पुरावा सादर केल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही व उमेदवारास परीक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल

2.4 उमेदवाराचे छायाचित्र व इतर मजकूर सुस्पष्टपणे दिसेल अशी मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत प्रत्येक पेपरच्यावेळी स्वतंत्रपणे सादर करणे अनिवार्य आहे.

2.5 भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह रंगीत प्रिंट मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

2.6 नावामध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहीत स्त्रियांच्या बाबतीत), नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावात बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

3. सोबत आणण्यास/बाळगण्यास परवानगी असलेले साहित्य :-

3.1 परीक्षा कक्षामध्ये फक्त खालील साहित्य घेऊन जाण्यास परवानगी राहील :-

(1) आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले सुस्पष्ट स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र
(2) काळ्या शाईचे बॉल पॉईंट पेन
(3) मूळ वैध ओळखपत्र
(4) मूळ वैध ओळखपत्राची सुस्पष्ट छायांकित प्रत
(5) मुखपट व हातमोजे
(6) फेस शिल्ड
(7) हॅंड सॅनिटायझरची पिशवी/बॉटल (पारदर्शक)

3.2 लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा भरपाई वेळेची परवानगी देण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांना आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'दिव्यांग उमेदवारांना मार्गदर्शक सूचना' मध्ये नमूद केल्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रे परीक्षा कक्षामध्ये नेण्यास परवानगी राहील. तथापि, आवश्यक कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कोणतीही कागदपत्रे परीक्षा कक्षामध्ये घेऊन गेल्यास आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

3.3 परवानगी नसलेले अन्य कोणतेही साहित्य (पाऊच, पर्स, बॅग्ज, नोट्स, पुस्तक, लेखन पॅड इत्यादी) परीक्षा कक्षामध्ये नेण्यास सक्त मनाई आहे.

3.4 स्मार्ट वॉच, डिजिटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल दूरध्वनी, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, परिगणक (Calculator) इत्यादी परीक्षा उपकेंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत :जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे

3.5 आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्या वेळी संबंधित परीक्षा उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा शाळा/ महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

4. प्रश्नपुस्तिका/उत्तरपत्रिकेबाबत :-

4.1 परीक्षेच्या वेळी हजेरीपट तसेच उत्तरपत्रिकेवरील नोंदी काळजीपूर्वक भराव्यात. हजेरीपटावर विहित जागेत उत्तरपत्रिकेचा व प्रश्नपुस्तिकेचा छापील अनुक्रमांक लिहून संपूर्ण स्वाक्षरी करणे अनिवार्य आहे.

4.2 परीक्षेस अर्ज सादर करताना केलेली स्वाक्षरी, प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी उत्तरपत्रिका तसेच हजेरीपटावर केलेली स्वाक्षरी एकच असणे व ती भविष्यातील कोणत्याही टप्प्यावरील पडताळणीच्या वेळी एकमेकांशी उमेदवाराच्या दैनंदिन वापरातील स्वाक्षरीशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे.

4.3 उत्तरपत्रिकेवर प्रश्नपुस्तिका क्रमांक व संच क्रमांक इत्यादी माहिती लिहून झाल्यावर प्रश्नपुस्तिका बदलून दिली जाणार नाही. तसेच या संदर्भात परीक्षेनंतर आलेल्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

4.4 प्रश्नपुस्तिकेत काही त्रुटी आढळल्यास संबंधित समवेक्षक, पर्यवेक्षक अथवा परीक्षा उपकेंद्रप्रमुख यांच्याकडे विचारणा अथवा चर्चा करु नये. प्रश्नपुस्तिकेमधील त्रुटींसंदर्भात लेखी निवेदन सहसचिव व परीक्षा नियंत्रक, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुख्य कार्यालय, 8 वा मजला कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षी कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई- 400021 यांच्याकडे संपूर्ण तपशीलासह परीक्षेच्या दिनांकापासून आठ दिवसांच्या आत सादर करावे.

4.5 प्रश्नपुस्तिकेच्या मुख पृष्ठावर इंग्रजी आद्याक्षर (A,B,C,D) हे संच क्रमांक दर्शविते. प्रश्नपुस्तिकेवरील सदर संच क्रमांक उत्तरपत्रिकेवर अचूकपणे नमूद करणे व संबंधित वर्तुळ छायांकित करणे आवश्यक आहे.

4.6 प्रश्नपुस्तिकेचा संच क्रमांक उत्तरपत्रिकेवर अचूकपणे न नोंदविल्यास शून्य गुण देण्यात येतात. प्रश्नपुस्तिकेचा संच क्रमांक उत्तरपत्रिकेवर विहित ठिकाणी नमूद करण्यामध्ये त्रुटी राहिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेच, या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

4.7 उत्तरपत्रिकेमध्ये विहित केलेल्या ठिकाणीच आपली उत्तरे नमूद करावीत. प्रश्नपुस्तिकेवर वा अन्य ठिकाणी उत्तरे लिहिल्यास आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन केले आहे, असे समजून कारवाई करण्यात येईल.

4.8 परीक्षा सुरु झाल्यानंतर ते परीक्षा कालावधी संपेपर्यंत कोणत्याही उमेदवारास कोणत्याही कारणासाठी परीक्षा कक्षाबाहेर जाण्याची परवानगी दिली जाणार नाही.

4.9 उत्तरपत्रिका किंवा प्रश्नपुस्तिका परीक्षा कालावधीत परीक्षा कक्षाबाहेर घेऊन जाता येणार नाही. तसेच, परीक्षेच्या कालावधीत संपूर्ण उत्तरपत्रिका आणि परीक्षेचा कालावधी संपल्यानंतर मूळ उत्तरपत्रिकेचा भाग-1 परीक्षा कक्षाबाहेर घेऊन जाण्यास सक्त मनाई आहे.

5. उत्तरपत्रिकेवर नोंदविलेल्या उत्तरांची संख्या नमूद करण्यासंदर्भात उमेदवारांना विशेष सूचना :-

5.1 परीक्षा कालावधी संपल्यानंतर उमेदवाराने सोडविलेल्या प्रश्नांची, (नोंदविलेल्या उत्तरांची) संख्या अचूकपणे उत्तरपत्रिकेवर विहित ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे. त्याकरीता उमेदवारास परीक्षेचा प्रत्यक्ष कालावधी संपल्यानंतर दोन मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात येईल.

5.2 परीक्षेच्या प्रत्यक्ष वेळेनंतरच्या दोन मिनिटांच्या अतिरिक्त कालावधीमध्ये उमेदवाराने सोडविलेल्या प्रश्नांची, (नोंदविलेल्या उत्तरांची) संख्या मोजून अचूकपणे विहित ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे. त्याशिवाय अन्य कोणतीही कृती या अतिरिक्त वेळेमध्ये करता येणार नाही.

5.3 उमेदवारांना सोडविलेल्या प्रश्नांची, (नोंदविलेल्या उत्तरांची) संख्या नमूद करण्याकरीता परीक्षेचा प्रत्यक्ष कालावधी संपल्यानंतर दोन मिनिटापेक्षा अधिक वेळ मिळणार नाही.

6. परीक्षेच्या वेळी शारीरिक/परस्पर अंतराच्या (Social Distancing) अनुषंगाने विशेष सूचना :-

6.1 परीक्षा उपकेंद्रामध्ये प्रवेश करतांना तसेच संपूर्ण परीक्षा कालावधीमध्ये उमेदवाराने स्वत :चा किमान तीन पदरी मुखपट (Mask) परिधान करणे अनिवार्य आहे.

6.2 परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान उमेदवारांनी स्वच्छता (Cleanliness) तसेच आरोग्यास हितावह (Hygienic) वातावरण राखण्यासाठी हात सतत सॅनिटाईझ करणे आवश्यक आहे

6.3 कोव्हिड-19 सदृश्य लक्षणे जसे की ताप, सर्दी, खोकला इत्यादी दिसून येत असल्यास संबधित परीक्षा उपकेंद्रावरील पर्यवेक्षकीय अधिकारी /कर्मचारी यांना आगाऊ कळवावे

6.4 उमेदवारांनी "आरोग्य सेतू" ॲप डाऊनलोड करणे व त्याद्वारे स्वयंमुल्यांकन करणे, उमेदवाराच्या हिताचे राहील.

6.5 उमेदवाराने स्वत :चा जेवणाचा डबा/अल्पोपहार व पाण्याची बाटली (पारदर्शक) सोबत आणणे, उमेदवाराच्या हिताचे राहील.

6.6 परीक्षा कक्षात एकमेकांचे पेन, लिखाण साहित्य इत्यादी वापरण्यास उमेदवारांना सक्त मनाई आहे.

6.7 शारीरिक/परस्पर अंतर राखण्याच्या अनुषंगाने परीक्षा उपकेंद्रावरील उचित माहिती फलक, सांकेतिक चिन्हे, भित्तिपत्रिका इत्यादी वरील सूचनांचे सर्व उमेदवारांनी कटाक्षाने पालन करावे

6.8 प्रतिबंधित क्षेत्रामधील परीक्षा उपकेंद्रावरील उमेदवारांची बैठक व्यवस्था ऐनवेळी इतर परीक्षा उपकेंद्रावर करण्यात आल्यास यासंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. तसेच संबधित उमेदवाराला त्याच्या आयोगाकडील नोंदणी क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे कळविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

6.9 परीक्षा संपल्यानंतर परीक्षा उपकेंद्राबाहेर जाताना शारिरीक /परस्पर अंतर राखणे उमेदवारांना अनिवार्य आहे.

6.10 वापरलेले टिश्यु पेपर, मुखपट, हातमोजे, सॅनिटाईझर पाऊच/बॉटल, इत्यादी वस्तू परीक्षा उपकेंद्रावरील फक्त आच्छादित कुंडीमध्ये (Dust Bin) टाकाव्यात.

6.11 कोव्हिड-19 विषाणूच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासन तसेच स्थानिक प्राधिकरणाकडून वेळोवळी जारी करण्यात आलेल्या सर्व सूचना/आदेश यांचे काटेकोरपणे पालन करावे

6.12 संबंधित पर्यवेक्षकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या सूचनेनुसार पडताळणीकरीता उमेदवारास चेहऱ्यावरील मुखपट काढणे अनिवार्य राहील.

7. सर्वसाधारण सूचना :-

7.1 प्रस्तुत प्रवेश प्रमाणपत्र परीक्षेच्या प्रवेशासाठी निर्गमित करण्यात आले असून परीक्षेस प्रवेश दिला, म्हणून आयोगाने उमेदवारी स्वीकारली, असा अर्थ होत नाही. उमेदवार कोणत्याही टप्प्यावर अपात्र असल्याचे आढळून आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

7.2 प्रवेश प्रमाणपत्राच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवारावरच राहील. अन्य व्यक्तीकडून कोणत्याही कारणाकरीता सदर प्रवेश प्रमाणपत्राचा दुरुपयोग केला गेला, तर त्या व्यक्तीकडून मदत घेतली नसल्याचे सिध्द करण्याची जबाबदारी उमेदवारावर राहील.

7.3 आयोगाच्या संकेतस्थळावरील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" या विभागामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सर्व तरतुदी काळजीपूर्वक वाचून त्यांचे कटाक्षाने अनुपालन करावे

7.4 प्रवेश प्रमाणपत्रावर तसेच परीक्षेच्यावेळी पुरविण्यात येणाऱ्या उत्तरपत्रिकेवर व प्रश्नपुस्तिकेवर दिलेल्या सूचना अत्यंत काळजीपूर्वक वाचून त्यांचे अनुपालन करावे.

7.5 आयोगाच्या परवानगीशिवाय कोणत्याही परिस्थितीत लेखनिकाची मदत व/किंवा भरपाई वेळ घेता येणार नाही.

7.6 परीक्षा उपकेंद्रप्रमुख, पर्यवेक्षक, समवेक्षक आदींकडून तसेच आयोगाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

7.7 परीक्षेसंदर्भात आयोगाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांबाबत आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळाचे अवलोकन करणे, उमेदवाराच्या हिताचे राहील.

8. परीक्षेनंतर :-

8.1 परीक्षा कालावधी संपल्यानंतर मूळ उत्तरपत्रिका लगेचच समवेक्षकांच्या ताब्यात द्याव्यात. तसेच सर्व उमेदवारांच्या मूळ उत्तरपत्रिका समवेक्षकाकडे जमा होवून त्याचा हिशोब लागेपर्यंत कोणत्याही उमेदवारास परीक्षा कक्षाबाहेर जाण्याची परवानगी नाही.

8.2 समवेक्षकाच्या परवानगीशिवाय उमेदवाराला स्वत :चे आसन सोडता येणार नाही.

8.3 परीक्षेनंतर मूळ उत्तरपत्रिका समवेक्षकाकडे जमा न करताच परीक्षा कक्षाबाहेर घेऊन गेल्यास अशी कृती आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार कडक कारवाई करण्यात येईल.